नाशिक
दि.०६/१०/२०२०

# प्रेसनोट

## आलोसे दिपक उल्हास चौधरी, कनिष्ठ अंभियंता, मराविवि कंपनी शिवाजीनगर जेलरोड नाशिक यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये शिक्षा झाले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | उपनगर पोलीस. स्टेशन, जि.नाशिक शहर गुरनं. ३३४/२०१६ |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | **आलोसे दिपक उल्हास चौधरी, कनिष्ठ अंभियंता, मराविवि कंपनी शिवाजीनगर, जेलरोड नाशिक** |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | २४,०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २४,०००/—रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे हौसिग सोसायटीचे चेअरमेन असताना त्यांचे सोसायटीतील ०८ नाविन वीज कनेक्शन जोडुन देण्यासाठी **आलोसे दिपक उल्हास चौधरी, कनिष्ठ अंभियंता, मराविवि कंपनी शिवाजीनगर जेलरोड नाशिक** यांनी तक्रारदार यांचेकडे २४०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती. तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक २१/७/२०१६ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे दिपक उल्हास चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडे २४,०००/— रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडून त्यांचे विरुध्द उपनगर पोलीस स्टेशन नाशिक शहर गुरनं. ३३४/२०१६ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक २१/७/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. नाशिक न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर खटल्याचा आज दिनांक ०६/१०/२०२० रोजी मा .श्री.एस.टी.पांडेय, जिल्हा व सत्र न्यायधिश, क्र.४ नाशिक यांनी निकाल दिला असून त्यात **आलोसे दिपक उल्हास चौधरी** यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायदा **कलम ७ प्रमाणे** — १ वर्ष सक्त मजूरी व २,०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी मजुरीची कैद तसेच **कलम १३ प्रमाणे** — १ वर्ष सक्त मजूरी व २,०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी मजुरीची कैद अशी शिक्षा ठोठावलेली आहे. सदर खटल्याचे कामकाज सरकारपक्षातर्फे श्री.योगेश कापसे, सहा.सरकारी अभियोक्ता, नाशिक यांनी पाहिलेले आहे. |

लाचलुपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

6.10.2020
( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक